# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 14/07/2023 (शुक्रवार) दुपार

---

## घरफोडी

**पो.स्टे. सावनेर** :– अंतर्गत योगेश पुरूषोत्तम वंजारी, वय २७ वर्ष, रा. वार्ड क्र. ४ रामकृष्ण नगर, गुजरखेडी ता. सावनेर येथे दिनांक ११/०७/२०२३ चे ०९.३० वा. ते दिनांक १२/०७/२०२३ चे रात्री ०९.३० वा. सुमारास फिर्यादी नामे– योगेश पुरूषोत्तम वंजारी, वय २७ वर्ष, रा. वार्ड क्र. ४ रामकृष्ण नगर, गुजरखेडी ता. सावनेर हे बाहेरगावाला लग्नाला गेले असता परत आल्यावर घरातील समान अस्तव्यस्त पडलेले होते व आलमारी मध्ये ठेवलेले नगदी १०,०००/– रू. व लहान मुलीच्या हातातील चांदीचे मनगटे २० ग्रॅमचे किंमती अंदाजे १५००/– रू असा एकुण ११,५००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३८०, ४५४, ४५७ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक लोखंडे मो. नं. ७७२१८१४३०० हे करीत आहे.

## चोरी

**पो.स्टे. पारशिवनी** :– अंतर्गत ०९ कि.मी. अंतरावरील मौजा आमडी फाटा येथे दिनांक १२/०७/२०२३ चे १७.०० वा. ते दिनांक १३/०७/२०२३ चे ११.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– दिलीप शामरावजी बावणे वय ४८ वर्षे धंदा नौकरी (हायवे पेट्रोलिंग सुपरवायजर) रा. कन्हान ता. पारशिवनी हा पारशिवनी कडून मनसर ते कन्हान कांद्री हायवे रोडने पेट्रोलिंग करीत असतांना आमडी फाटा येथिल पुलाच्या खाली लावलेले ओरीयंटल कंपनीचे दोन कॉनवेक्स मिरर प्रत्येकी ४०००/– रू असा एकूण किंमती ८०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार वरखडे मो. नं. ९७६३२१५४६५ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर